(५)

क्र.का.१२/मु.प./ऑनलाईन परतावा/ २८
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत,
पुणे ४११ ००१
दि. ६/०१/२०१४

(२)

**प्रति,**

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर
३) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी

**विषय :- मुद्रांक शुल्क परतावा अर्जाबाबत ऑन लाईन पदधतीने करावयाची कार्यवाही.**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का.१२/मु.प./परि./ऑनलाईन परतावा/७/१४
दि.३/१/२०१४

मुद्रांक परतावा प्रणालीद्वारे (online Refund Application) परतावा अर्ज स्विकारणेचे कार्यपध्दतीबाबत सविस्तर मार्गदर्शन संदर्भित परिपत्रकान्वये करणेत आले असून मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात ऑन लाईन पध्दतीने दाखल परतावा प्रकरणाबाबत करावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. **Login Page** :-

मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी http://appl1igr.maharashtra.gov.in/refund या URL चा वापर केल्यानंतर प्राप्त पर्यायापैकी Login पर्याय निवडून त्यावर click करावे. त्यानंतर आपणांस दिलेल्या login Id आणि Password चा वापर करुन Login करावे.

२. **Login Successful** :-

Login successful झाल्यानंतर Home Page वर एकुण आठ पर्याय असतील या आठ पर्यायाचा वापर करुन मुद्रांक जिल्हाधिकारी/सह जिल्हा निबधक यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२.१ **Search :-**

यामध्ये परतावा प्रकरणावरील Refund Code नमूद करुन search वर click करावे. त्यानंतर संगणक स्क्रिनवर परतावा प्रकरणाची माहिती दिसेल. प्रकरणासंबंधीची सर्व माहिती तक्त्यात (टेबल) उपलब्ध होईल. तक्त्याच्या खालील रिकाम्या चौकटीत परतावा प्रकरण मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष दाखल झाल्याचा (Physical submission date ) दिनांक नमूद करुन submit बटनवर click करावे. यानंतर स्क्रिनवर प्रलंबित परतावा कोड नुसार प्रकरणाची माहिती

प्राप्त होईल. वरीलप्रमाणे सर्व प्रलंबित प्रकरणांच्या Refund code नुसार प्रत्यक्ष प्रकरणांचा दाखल दिनांक नमूद करुन submit button वर क्लिक करावे.

## २.२ Document Varification :-

यामध्ये दिनांक , परताव्याचे कारण, प्रकरणाची सद्यःस्थिती असे तीन पर्याय असतील. त्यातील कोणत्याही एका पर्यायाची निवड करुन क्लिक करावे. त्यानंतर चढत्या अथवा उतरत्या क्रमाने दिनांकनिहाय प्रलंबित प्रकरणांची यादी दिसेल. सदर यादीतील कोणतेही एक प्रकरण निवडा, त्यानंतर प्रकरणासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी येईल. प्रत्येक कागदपत्रासमोर एक Check Box असेल सदर कागदपत्र प्राप्त झालेले असल्यास त्यासमोरील Check Box वर क्लिक करावे. त्यानंतर स्कॅनिंग करुन पाठविलेले दस्तऐवज (कागदपत्रांचे पुरावे) Upload Link द्वारे upload करुन घ्यावीत. परतावा प्रकरणास आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे प्रकरणासोबत जोडली (attach) असतील तर complete या button वर क्लिक करावे आणि कागदपत्राची पुर्तता झाली नसल्यास incomplete या button वर क्लिक करावे म्हणजे सदर प्रकरणांत प्रलंबित असलेल्या कागदपत्रांची यादी दिसेल.

## ३. Case Verification :-

यामध्ये प्रलंबित Refund Code सह प्रकरणांची यादी दिसेल. त्यातून प्रलंबित Refund code प्रमाणे प्रकरणे निवडा. यानंतर मुंबई (महाराष्ट्र) मुद्रांक अधिनियम १९५८ मधील कलम ४४, कलम ४७ ते ५२ मधील तरतुदी संगणक स्क्रिनवर उपलब्ध होतील. परतावा प्रकरणास जे कलम त्यातील उप कलमासह लागू हात असेल त्या समोर Yes या पर्यायावर click करावे. जे कलम लागू होत नसल्यास No या पर्यायावर Click करावे. यानंतर Proceed या बटनावर क्लिक करावे. स्क्रिनवर खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध होतील.

१) कागदपत्रा अभावी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तपशिल दिसेल.

२) प्रलंबित प्रकरणांचा Refund Code दिसेल.

३) परतावा प्रकरणास लागू असलेल्या कलमांची माहिती दिसेल.

४) मोकळया चौकटीत परतावा प्रकरणासंबंधी आवश्यकतेप्रमाणे अभिप्राय नमूद करावेत.

५) प्रकरणांची परिपूर्ण पडताळणी/तपासणी झाली असल्यास "verified" button वर क्लिक करावे. अन्यथा "pending " button वर click करावे.

## ४. Generate Summary :-

प्रकरणासोबत जोडलेले सर्व कागदपत्राची पडताळणी/तपासणी झाली असल्यास सदर प्रकरणाची समरी स्लिप download करुन प्रिंट काढून प्रकरणासोबत जोडावी.

वरीलप्रमाणे online Refund Application चे अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) online Refund Application चा वापर **दि.१०/०१/२०१४** पासून सक्तीचा करणेत येत असून यापुढे सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी/सह जिल्हा निबंधक कार्यालयात मॅन्युअल पध्दतीने परतावा अर्ज स्विकारणे पूर्ण पणे बंद करावे.

२) online Refund Application आणि Physical submission या दोन्ही पध्दतीने परतावा प्रकरणे कलम ४४, ४८ मध्ये विहित केलेल्या कालावधीत दाखल करणे आवश्यक आहे. परतावा प्रकरण मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष दाखल झाल्याचा दिनांक हा खऱ्या अर्थाने प्रकरण दाखल केल्याचा दिनांक राहील.

३) Physically दाखल परतावा अर्जावर आवक शिक्का उमटवून त्यावर लिपिक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दिनांकीत स्वाक्षरी करावी. तसेच त्या प्रकरणांत online Refund Application करण्यात आल्याची खातरजमा करावी.

४) Login I D आणि Password सर्व मु.जि., नोंउपमनि व अपर मुद्रांक नियंत्रक यांना पाठविणेत आले आहेत. त्यांनी सदरचा Password आपले स्तरावर त्वरित बदल करुन घ्यावा.

५) Refund Application बाबत तांत्रीक अडचणी उद्‌भवल्यास do12.igro@igrmaharashtra.gov.in या email Id वर स्क्रीन शॉट सह व आपल्या अभिप्रायासह संपर्क करावा.

६) मुंबई विभागासाठी अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांनी व इतर विभागासाठी संबंधित मुद्रांक उपनियंत्रक यांनी दैनंदिन online परतावा करीता दाखल प्रकरणे, प्रत्यक्ष दाखल (physically submitted) प्रकरणे, मंजूर/नामंजूर, Forward केलेल्या प्रकरणांचा आपल्या विभागाचा एकत्रित आढावा घ्यावा.

दिनांक **१०/०१/२०१४** पासून सर्व परतावा प्रकरणे वरील प्रमाणेच मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात स्विकारुन कार्यवाही पूर्ण करावी. तसेच सदर कार्यपध्दती सुरु होण्यापूर्वीच्या शिल्लक प्रकरणांची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्यात एक्सेल शिट मध्ये तयार करुन उपरोक्त ई-मेलवर पाठवावी.

का.प्र.मा.नों.म.नि.यांचे सहीची असे.

**सह नोंदणी महानिरीक्षक तथा**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**